# फायनान्स ॲण्ड अकाउंट्स एम्प्लॉईज युनियन

*प्लॉट नं. १२, रवी नगर, धुळे रोड, अमळनेर, जळगाव ४२५ ४०१*

***(रजि.नं. एनएसके/जे/२३८२)***

| विशाल लोहार | विजय जाधव | प्रितम घोगरे |
|---|---|---|
| अध्यक्ष | महासचिव | उपाध्यक्ष |
| ९६६५२०२७३६ | ९३०९८१७९८३ | ९३७०९३१५९२ |

**संदीप तिकटे**
*कोषाध्यक्ष*
९७६६२०९६७८

**प्रशांत नरड**
*प्रसिद्धी प्रमुख*
९१४६६८६२२०

**लक्ष्मीकांत पवार**
*सहसचिव*
९६६५३०५५७७

**विलास लकडे**
*सहसचिव*
९६३७४१५४४५

**परेश कलंत्री**
*संघटक*
९७६७४०१४५३

**स्नेहल वैष्णव**
*महिला प्रतिनिधी*
९६३७४१५४४५


जा.क्र.FAEU/ मुख्य का./ २२ दिनांक: ०४/०१/२०२६

**प्रति,**
**मा.देवेंद्र फडणवीस साहेब ,**
**ऊर्जा मंत्री तथा मुख्यमंत्री,**
**महाराष्ट्र राज्य मंत्रालय ,**
**मुंबई - ४०००३२**

**विषय** – महावितरण मधील लेखा विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक अर्हता तसेच कामाचे स्वरूप याचा विचार करून पदांची नावे बदलविण्याबाबत.

**संदर्भ -**
1) Administrative Circular number 22 Date - 01.03.2006
2) Administrative Circular number 41 Date - 05.05.2006
3) Administrative Circular number 43 Date - 08.05.2006
4) Administrative circular number 83 Date - 17.10.2006
5) Administrative circular number 119 Date - 31.08.2006
6) Administrative circular number 209 Date - 10.02.2009
7) Administrative circular number 467 Date - 23.07.2013
8) Administrative circular number 490 Date - 01.07.2014
9) Administrative circular number 535 Date - 25.04.2016
10) Administrative circular number 545 Date - 15.10.2016
11) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२४ / प्र. क्र.२१३ / ई-१० दिनांक – १४.१०.२०२४
12) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२४/ प्र. क्र. ४१२/ ई-१० दिनांक – १४.१०.२०२४
13) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१९/ प्र. क्र. ७९६/ आस्था -७ दिनांक - १४.०९.२०२४
14) IBPS CORRIGENDUM, DATE – 04.11.2024
15) जा.क्र.FAEU/ मुख्य का./ १८ चिनांक: ०४ /११ / २०२५

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने महावितरण कंपनीमधील वित्त व लेखा विभाग हा बिलिंग,लेखा व अंकेक्षण कार्यामध्ये खूप महत्वाची भूमिका बजावत आलेला असून सद्य स्थितीमध्ये जवळपास ५००० लेखा अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. वित्त व लेखा विभागामध्ये काळानुरुप उच्चशिक्षित अधिकारी व कर्मचारी यांची भरती व्हावी हा उद्देश समोर ठेऊन गेल्या काही वर्षापासून महावितरण प्रशासनाने निम्नस्तर लिपिक (लेखा) **या पदाची शैक्षणिक अहर्ता बि.कॉम पदवीधर तसेच पदव्युत्तर पदवी/पदविका धारण(M.com/MBA) केलेल्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल अशी शैक्षणिक अहर्ता केलेली आहे.**

निम्नस्तर लिपिक (लेखा) हे पद एमएसईबी बोर्ड स्थापन असल्यापासूनचे लेखा विभागातील सुरुवातीचे/महत्वाचे पद असून त्यावेळी सदर पदाकरिता शैक्षणिक अहर्ता हि १० वी पास होती तदनंतर हीच शैक्षणिक अहर्ता १२ पास करण्यात आली व गेल्या काही वर्षापासून याच पदाकरिता शैक्षणिक अहर्ता हि बि.कॉम पदवीधर तसेच पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका धारण केलेल्या उमेदवाराला प्राधान्य दिले जाईल अशी शैक्षणिक अर्हता करण्यात आली आहे. महावितरण प्रशासनाने वेळोवेळी इतर संवर्गातील पद नामांतर केले आहे त्याप्रमाणे लेखा विभागातील पदाची शैक्षणिक अर्हता अद्यावत करत असताना पद नाम अद्यावत करणे गरजेचे होते. परंतु तसे न

संदीप तिकटे
कोषाध्यक्ष
९७६६२०९६७८

प्रशांत नरड
प्रसिद्धी प्रमुख
९१४६६८६२२०

लक्ष्मीकांत पवार
सहसचिव
९६६५३०५५७७

विलास लकडे
सहसचिव
९६३७४१५४४५

परेश कलंत्री
संघटक
९७६७४०१४५३

स्नेहल वैष्णव
महिला प्रतिनिधी
९६३७४१५४४५


करता लेखा विभागातील पदांची नावे पूर्वीप्रमाणे कायम ठेवण्यात आले आहे. सध्या महावितरण मध्ये अमुलाग्र बदल होत आहेत लेखा कमर्चारी (LDC/UDC/AA) उच्च शिक्षित असल्याने त्याचा कंपनीस फायदाच होत आहे.

महावितरण प्रशासनाने शैक्षणिक अर्हतेचा व विशिष्ट कर्मचारी संघटना यांच्या मागणीचा विचार करून संदर्भीय पत्र क्र. ८ नुसार अभियंता यांचे पदनाम अद्यावत केले आहे त्याप्रमाणे **Sub Engineer** पदाचे नामांतर **Junior Engineer, Junior Engineer** पदाचे नामांतर **Assistant Engineer** तसेच **Assistant Engineer** पदाचे नामांतर **Deputy Executive Engineer** असे करण्यात आले आहे. तसेच संदर्भीय पत्र क्र. १ ते १० नुसार विविध संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांच्या पदांची नावे बदलविलेली आहेत. त्याच धर्तीवर शैक्षणिक अर्हतेचा विचार करता गेल्या कित्तेक वर्षापासून लेखा विभागातील निम्नस्तर लिपिक (लेखा), उच्च निम्नस्तर लिपिक (लेखा), सहाय्यक लेखापाल या पदांची नावे बदलण्यात यावीत अशी लेखा कर्मचाऱ्यांची मागणी असून महावितरण प्रशासनाने सदर बाबतीची दाखल घ्यावी अशी संघटनेची मागणी आहे.

महावितरण हे महाराष्ट्र शासनाच्या धर्तीवर कार्यरत असून नुकतेच संदर्भीय पत्र क्र. ११ नुसार महसूल व वनविभागाने **'तलाठी'** या पदाचे नाव बदलून **'ग्राम महसूल अधिकारी'** हे केले आहे. तसेच संदर्भीय पत्र क्र.१२ नुसार याच विभागातील **'कोतवाल'** या पदाचे नाव बदलून **'महसूल सेवक'** हे केलेले आहे. त्याचप्रमाणे ग्राम विकास विभागाने **'ग्रामसेवक'** व **'ग्रामविकास अधिकारी'** हि दोन्ही पदे एकत्रित करून सदर पदाचे नामाभिदान हे **'ग्रामपंचायत अधिकारी'** हे केले आहे. तसेच केंद्र शासनाने संदर्भीय परिपत्रक १४ अन्वये बँकेतील **'लिपिक'** या पदाचे नाव बदलून **'Customer Service Associate' (CSA)** असे केले आहे. वरील कोतवाल हे पद सोडल्यास अन्य सर्व पदे हि पदवीधर या शैक्षणिक अहर्तेवर महाराष्ट्र शासनाद्वारे भरली जातात.

करिता निम्नस्तर लिपिक (लेखा), उच्चस्तर लिपिक (लेखा) व सहाय्यक लेखापाल या पदांची नावे शैक्षणिक अहर्तेचा विचार करून अनुक्रमे Junior Accountant, Assistant Accountant व Senior Accountant अशी बदलविण्यात येऊन लेखा विभागातील कर्मचारी यांचेवर होत असलेला पदनामातील भेदभाव दूर करावा अशी संघटनेची अभ्यासपूर्ण मागणी आहे.संघटनेतर्फे संबधित पदांची नावे खालील प्रमाणे सुचविण्यात येत आहे.

| पदाचे सध्याचे नाव | मागणीनुसार नवीन नाव |
|---|---|
| निम्नस्तर लिपिक (लेखा)/LDC | कनिष्ट लेखापाल / (Junior Accountant) |
| उच्चस्तर लिपिक (लेखा)/UDC | सहाय्यक लेखापाल / (Assistant Accountant ) |
| सहाय्यक लेखापाल/AA | वरिष्ठ लेखापाल / (Senior Accountant) |

वरील प्रमाणे लेखा विभागातील कर्मचाऱ्यांची शैक्षणिक अर्हता व कंपनी स्थापनेपासून कामातील झालेला अमुलाग्र बदल याचा विचार करून पद नामांतर करण्यात यावे लेखा विभागातील महत्वपूर्ण मागणी निकाली काढून लेखा विभागाला न्याय द्यावा.

धन्यवाद!

**अध्यक्ष**

**प्रत सस्नेह सादर** – मा. व्यवस्थापकीय संचालक,महावितरण कंपनी मर्या., प्रकाशगड, मुंबई – ५१.